# HITECH Research Analysis

Year - VIII, Issue - XV, Vol. V
Feb. 2018 To July 2018
Impact Factor 3.92 (GRIFI)
ISSN 2231-6671


UGC Approved, International Registered, Recognized, Peer Reviewed, Indexing & Impact Factor Research Journal, Related to Higher Education for all Subjects

Bharat Shikshan Prasarak Mandal, Latur

Jaikranti Arts & Commerce Senior College, Latur

One Day National Seminar on

## Intellectual Property Rights With Special Reference to Patents and Copyrights in India



EDITOR IN CHIEF

Dr. P. N. SAGAR

JPL Jyotichandra Publication, Latur
www.irasg.com

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 13 | Intellectual Property Rights : An Overview<br>**J. R. Shankpale** | 71 |
| 14 | Present Scenario of Intellectual Property Rights in India<br>**Dr. Pushpalata G. Kawale** | 76 |
| 15 | Innovation and Competitiveness in the Intellectual Property Rights In India<br>**Rajabhau Sidaji Mane** | 82 |
| 16 | Importance Of Copyright Protection in Digital Age<br>**Mrs. Rita S. Kadam (Khose)** | 88 |
| 17 | Plagiarism in Academic Research<br>**Dr. H. S. Patange, Ms. Savita Punjabi** | 92 |
| 18 | बौध्दिक संपदा के मुख्य रुप<br>**डॉ. दिलीप आर. गुंजरगे** | 97 |
| 19 | पेटेण्ट- एक बौध्दिक सम्पदा अधिकार<br>**डॉ. आर. एस. पवार** | 100 |
| 20 | बौध्दीक मालमत्ता अधिकारात मतीमंदाना गतीमान करणे काळाची गरज : एक समाजशास्त्रीय दृष्टीकोण<br>**प्रा. सौ. माधुरी गोविंद गिरी** | 104 |
| 21 | संशोधन आणि वाड्मयचौर्य<br>**डॉ. ओ. व्ही. लिगाडे** | 107 |
| 22 | बौध्दिक संपत्ती अधिकार : कॉपी राईट<br>**डॉ. धिरजकुमार सत्येकाल कोतमे** | 110 |
| 23 | बौध्दिक संपत्ती अधिकार : स्वरुप आणि आकलन<br>**डॉ. केशव आलगुले** | 114 |
| 24 | बौध्दिक संपदा म्हणून कॉपीराईटची आवश्यकता<br>**प्रा. प्रविण आनंद अनभुले** | 118 |
| 25 | उदयोन्मुख प्रवाह : बौध्दिक संपदा अधिकार<br>**प्रा. प्रमोद चव्हाण** | 121 |
| 26 | कॉपीराईटचे उच्च शिक्षणात महत्व<br>**डॉ. एम. डी. कच्छवे** | 125 |
| 27 | बौध्दिक संपदेचा अधिकार आणि भारतीय नीतीविचार<br>**डॉ. माधवी बादाडे** | 129 |

Issue - XV, Vol. V
HI-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.92
ISSN 2231- 6671
Feb. 2018 To July 2018


Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

26

# कॉपीराईटचे उच्च शिक्षणात महत्व

**डॉ. एम. डी. कच्छवे**
वाणिज्य विभाग प्रमुख,
रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी

## Research Paper - Commerce

**प्रस्तावना :-**

पंधराव्या शतकात मुद्रण कलेचा शोध लागल्यानंतर राजाकडून छपाईसंबंधी एक स्वाधिकार किंवा विशेषाधिकार दिले जात असत. मध्ययुगात युरोपात प्रकाशकांच्या संघटना शाही संमतीनेच उभ्या राहिल्या. या संघटनामार्फत वाङ्मयीन किंवा कलाकृतीचे चौर्य किंवा त्यांचा अनधिकृत उपयोग यावर नियंत्रण ठेवले जाई. इंग्लडमध्येही 'स्टेशनर्स कंपनी' या शासकीय संस्थेकडे 1556 हे काम दिले होते. या संस्थेत सुरुवातीला शंभरावर मुद्रक आणि ग्रंथविक्रेते होते. लेखकाच्या पूर्वसंमतीशिवाय त्याचे लेखन प्रकाशित होऊ नये एवढेच कायदेशीर संरक्षण लेखकाला होते. 1710 मध्ये इंग्लंड मध्ये लेखाधिकार अधिनियम समंत झाला. त्यानुसार 14 वर्षापर्यंत आपल्या निर्मितीबाबत कायदेशीर हक्क लेखकाला प्राप्त झाला. प्राचीन काळात बौद्धिक मालमत्तेशी संबंधित गुन्हा गुंतागुंतीचे नव्हते. प्रिंटिंग प्रेसच्या शोधामुळे पुस्तकाच्या हजारो प्रती मुद्रित करणे शक्य झाले म्हणून या कायद्याची गरज निर्माण झाली.

भारतात 1914 मध्ये लेखाधिकारासंबंधीचा प्रथम अधिनियम करण्यात आला. इंग्लंडच्या 'इंपीरियल कॉपीराइट ॲक्टचा' भाग भारतात लागू करण्यात आला. हा कायदा 1957 चा कायदा अस्तित्त्वात येईपर्यंत लागू होता. या कायद्यात शासनाने 1983-84 मध्ये दुरुस्ती करुन कांही बदल केले. 15 जानेवारी 2000 पासून प्रभावी सर्व समावेशक कायदा केला आहे. भारतात संबंधित लेखनकृती प्रसिद्ध करताना इंग्रजी 'सी' अक्षरात वर्तुळात म्हणजे असे काढून पुढे लेखाधिकारी व्यक्तीचे किंवा संस्थेचे नाव लिहिण्यात येते. त्यापुढे प्रसिद्धीचे वर्ष

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



लिहावे लागते.

वाचन, प्रकाशन, कॉपीराइट यांना उत्तेजन देण्यासाठी युनेस्कोने जाहीर केलेल्या जागतिक पुस्तक दिनानिमित्त सोशल मिडीयावर पोस्टर्सची गर्दी जमली. वाचन, प्रकाशन आणि साहित्य चोरीच्या प्रकारांना आळा घालणाऱ्या 'कॉपीराइट' या संकल्पनेला उत्तेजन देण्यासाठी युनेस्को दरवर्षी 23 एप्रिलला जागतिक पुस्तक दिन साजरा करते. संगणक, इंटरनेट इत्यादी काळात तांत्रिक उपकरणामध्ये लेखक आणि प्रकाशकांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी भारत सरकारने कॉपीराईट ऍग्रीमेंट 2010 आणण्याचा निर्णय घेतला.

**संशोधनाचा उद्देश :-**

सदर शोधनिबंध खालील उद्देश डोळ्यासमोर ठेवून करण्यात आला आहे.

1. कॉपीराईटचा इतिहास पाहणे.
2. कॉपीराईटचे उच्च शिक्षणात महत्त्व शोधणे.
3. निष्कर्ष काढणे.

**गृहितके :-**

1. कॉपीराईट कायद्यात वेळोवेळी बदल करण्यात आले
2. बऱ्याच प्रमाणात वाङ्मय चोरीला जाते.
3. लेखन प्रसिद्ध करताना इंग्रजी 'सी' अक्षरात वतुळांत काढले जाते.
4. लेखकाच्या मृत्यूनंतर 60 वर्षांनी त्याचे लेखन साहित्य कॉपीराईट पासून मुक्त होते.

**अभ्यास पद्धती :-**

सदर शोध निबंधासाठी दुय्यम माहितीचा वापर करण्यात आलेला आहे. दुय्यम माहितील संदर्भग्रंथ, दै. वर्तमानपत्रातील लेख, मासिके इ. चा आधार घेतला आहे. वरील उद्दिष्टे लक्षात ठेवून सामग्री संकलन केले आहे.

**कॉपीराइट अधिनियम :-**

या कायद्याचा मुळ उद्देश कॉपीराइटच्या मुळ मालकी बेइमानीने नक्कल करण्यापासून रक्षण करणे असा आहे. कॉपीराईट कार्यालय स्थापन करण्यात आले. अध्यक्षपदी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती यांची नियुक्ती करण्यात येते. विनापरवानगी एखाद्याची साहित्यकृती प्रकाशित करणे, त्याचा फायदा घेणे, सार्वजनिक ठिकाणी दाखविणे इ. कॉपीराईटचे उल्लंघन झाल्यानंतर जवळच्या पोलीस ठाण्यात एफआय आर दाखल करता येतो. स्पर्धा परीक्षेच्या प्रकाशनाचे नाव बदलून आपल्या नावे पुस्तक तयार करणाऱ्यास गुन्हा दाखल झालेला आहे. कोणत्याही लेखकाचा त्याने लिहिलेल्या मूळ संहितेवर स्वामित्त्व हक्क (कॉपीराइट) असतो. तो लेखक आणि प्रकाशक यांच्यातील करारावर नोंदवलेला असतो. लेखकाच्या मृत्यूनंतर 60 वर्षांनी त्याचे लेखन

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



कॉपीराइटपासून मुक्त होते. कॉपीराइट हा कायद्याचा गाभा मानला जातो.

**कॉपीराईट :-**

सध्याच्या या आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात सगळीकडे फेसबुक, वॉटस्ॲप चा वापर फार मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. या माध्यमातून समाजातील व्यक्ती त्यांचे लेख, कविता, गझल्स, फोटो इ. कलाकृती पोस्ट करत असतात. वाऱ्याच्या वेगाने ही माहिती कांही क्षणातच संपूर्ण जगभर पसरते. हा प्रसार होत असताना मुळ लेखकाचे, कवीचे नाव पुढे जाईलच असे सांगता येत नाही. तंत्रज्ञानातील कॉपी, पेस्ट, फॉरवर्ड, शेयर इत्यादीच्या विविध तंत्रामुळे मुळ नावा ऐवजी दुसऱ्याच व्यक्तीच्या नावाने माहिती पुढे पाठविली जाते. हे साहित्य चोरुन स्वतःच्या नावाने पाठवून त्याचे श्रेय घेतले जाते. आज चोरलेल्या कविता, लेख, फोटो इत्यादी माहिती फेसबुक, वॉटस्ॲप दुसऱ्याच व्यक्तीच्या नावाने पुढे पाठविली जाते. या प्रकाराला आळा घालणे अशक्य असले तरी सावधानता बाळगणे महत्त्वाचे आहे.

'कोणत्याही व्यक्तीच्या संगीत, नाट्य, साहित्य, कलात्मक कलाकृती आणि सिनेमा या बौद्धिक संपदेबाबत कायद्याने देण्यात आलेले आणि संरक्षित केलेले अधिकार म्हणजे कॉपीराईट होय'.

यात कथा, कादंबरी, ललीत, साहित्यिक लेखन, संशोधनात्मक तसेच अभ्यासात्मक लेखन, लेख कविता, गझल, गाणी, नाटक, संगीत, पेंटींग अशा कलाकारास त्या त्या कलाकृतीचा कॉपीराईट मिळतो. कलाकृतीच्या निर्मात्यास त्याच्या बौद्धिक संपदेची कॉपीराईट नोंदणी करणे बंधनकारक नाही. कलाकृती निर्माण करणाऱ्या व्यक्तीस किंवा कलाकारास त्या कलाकृतीची निर्मिती केल्यानंतर न मागता तिच्यावर कॉपीराईट हक्क प्राप्त होतो. सर्व आर्थिक आणि नैतिक हक्क प्राप्त होतात. कवी, लेखक किवा कलाकाराचे नाव लिहिण्या अगोदर कोणत्याही कलाकृतीवर © हे चिन्ह असते.

**कॉपीराईटचे महत्त्व :-**

1) भविष्यात आपल्या साहित्याची कोणी चोरी केल्यानंतर नोंदणीकृत कॉपीराईट हा न्यायालयीन प्रकरणात महत्त्वाचा पुरावा ठरतो.

2) हे चिन्ह व त्यापुढे नाव लिहिल्यानंतर त्यावर संबंधित व्यक्तीचा हक्क गृहीत धरला जातो.

3) कॉपीराईट हा त्या व्यक्तीच्या अभिव्यक्तीस निर्मितीस मिळते.

4) कॉपी राईट अधिनियम 1957 मधील कलम 63 अन्वये कोणत्याही कामाच्या कॉपीराईटचे उल्लंघन करणे हा दखलपात्र गुन्हा आहे.

5) कॉपी, पेस्ट, फॉरवर्ड इ. तंत्रामुळे मजकूर संपादन किंवा एडीट करणे किंवा बदल करणे खूप सोपे झाले आहे.

6) कॉपीराईट हक्काची कालमर्यादा सदर कलाकृती निर्माण करणाऱ्या निर्मात्याच्या आयुष्यभर आणि

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



मृत्यूनंतर 60 वर्ष राहते.

7) गुन्हा सिद्ध झाल्यानंतर 6 महिने कैद आणि कमीत कमी 50,000 रुपये दंड लागतो.

8) लहान मुलांच्या कलाकृतीच्या बाबतीतही हे चिन्ह वापरुन त्याचे नाव लिहावे. लहान मुलांचे साहित्य प्रसिद्ध करताना त्यांची व पालकांची लेखी परवानगी घ्यावी लागते.

9) कोणत्याही व्यक्तीला आपले साहित्य वापरण्यासाठी दिल्यानंतर त्याचा लेखी करारनामा करावा लागतो.

10) कॉपीराईट कायद्यामुळे लेखकाचा अधिकार कायम राहतो. लेखकाचं लेखन हे त्याचं धन असतं ते कुठे, कोणी प्रकाशित करावं आणि किती लोकांपर्यंत पोहोचावं हे लेखकाचे मत असते. कांही लेखक हे स्वातंत्र्य अबाधित ठेवतात तर कांही लेखक प्रकाशकांना हक्क देतात.

**सारांश :-**

चित्रपट, साहित्य, कला, संगित, रेकॉर्डिंग आणि प्रसारण कॉपीराईट कायद्याखाली होऊ शकते. एका दृष्टीक्षेपात कॉपीराईट सोपे वाटू लागते. परंतु कायद्याचे उल्लंघन केल्यास फार महाग पडू शकते. कॉपीराईट ॲक्टची मुदत संपल्यानंतर जर लेखकांच्या आणि त्यांच्या वारसदारांच्या लक्षात आलं तर लेखकाचे कोणी हक्क डावलतयं यासाठी कायद्यात लेखक आणि प्रकाशन या दोघांनाही समान हक्क मिळेल अशी तरतूद करायला पाहिजे.कॉपीराईट कायदा हा तकलादू आहे. लेखकांना मिळणारी रॉयल्टी, मानधन मिळत नाही आणि मिळाली तर समाधानकारक नाही. आवृत्तीच्या मर्यादा नसल्यामुळे प्रकाशक जनआवृत्तीच्या नावाखाली भरपूर प्रती छापून घेतो. त्यासाठी कुठल्याही लेखन व्यवहारात लेखक आणि प्रकाशक यांच्यातील करारनामा महत्त्वाचा असतो.

अलिकडच्या काळात उच्चशिक्षणात मोठ्या प्रमाणात संशोधने होत आहेत. ग्रामीण भागात शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. संशोधन करत असताना दुसऱ्या संशोधनातून मजकूर चोरीला फार मोठ्या प्रमाणात घेतला जात आहे. सद्य स्थितीत इंग्रजीमधून संशोधन करणाऱ्या संशोधकाला (पीएच.डी.) तो शोध निबंध (थेसीस) विद्यापीठाकडून तपासून घेवूनच सादर करावा लागतो.

## संदर्भ सूची :-

1. मोहिनी घारपुरे : कॉपीराईट कायदा सक्षम, पारदर्शक व्हावा, दै. दिव्य मराठी दि. 09 ऑगस्ट 2012.
2. Government of India, Ministry of Education, Copyright International Conventions Hand book, New Delhi, 1967.
3. मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani